दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १४८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२७ ऑगस्ट २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## बंडखोरांचा समाचार घेण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या ३ मोठ्या सभा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेनेला सावरण्यासाठी, शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य फुलवण्यासाठी आदित्य ठाकरेंच्या पाठोपाठ पक्षप्रमुख उद्धव ठाकरेही मैदानात उतरणार आहेत. शिवसेनेत मोठी पडझड झाल्यानंतर पक्ष सावरण्यासाठी युवा नेते आदित्य ठाकरे कामाला लागले आहेत. आदित्य यांच्या सभांना प्रचंड प्रतिसाद मिळत असताना आता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही शड्डू ठोकला आहे. बंडखोरांचा समाचार घेण्यासाठी येत्या महिनाभरात उद्धव ठाकरे यांच्या तीन मोठ्या सभा पार पडणार आहेत.

महाराष्ट्रातील राजकारणात उद्धव ठाकरे विरुद्ध एकनाथ शिंदे असा संघर्ष होत आहे. आदित्य ठाकरे शिवसंवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यव्यापी दौऱ्यावर आहेत. त्यांच्या या दौऱ्याला जनतेचाही मोठा पाठिंबा मिळत आहे. त्याशिवाय आता उद्धव ठाकरेंनीही राज्यव्यापी महाप्रबोधन यात्रेची घोषणा केली आहे.

उद्धव ठाकरेंची ही महाप्रबोधन यात्रा गणपती उत्सवानंतर सुरू होणार आहे. एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात म्हणजेट ठाण्यातल्या टेंभी नाक्यात उद्धव ठाकरे यांची पहिली सभा होणार आहे.

# गणेशोत्सवापूर्वी संपूर्ण रस्ता वाहतुकीसाठी सुसज्ज होणार : ना.रविंद्र चव्हाण



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखरूप होण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गावरील रस्ते दुरुस्ती, खड्डे भरण्याची कामे शंभर टक्के पूर्ण करण्याचे निर्देश राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री रविंद्र चव्हाण यांनी आज येथे दिले.**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर रस्त्याचा पाहणी दौरा केला. यावेळी त्यांच्यासमवेत आमदार भरत गोगावले, आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती रुपाली पाटील, अलिबाग सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प संचालक आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधमकाम मंत्री श्री. चव्हाण यांनी आज पनवेल येथून आपल्या दौऱ्याची सुरुवात केली. रायगड जिल्हयातील या पाहणी दौऱ्यात मंत्री महोदयांनी कासू, नागोठणे, वाकण फाटा, खांब, वरसगाव फाटा, इंदापूर आदि ठिकाणी जावून रस्त्याच्या सुरू असलेल्या दुरुस्ती कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

या भागातील अनेक परिसरांमध्ये पावसामुळे पडलेल्या खड्ड्यांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. काही ठिकाणी खड्डे युध्द पातळीवर बुजविण्याच्या दृष्टीने रेडीमिक्स या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. हे तंत्रज्ञान कशा पध्दतीने रस्त्यांमधील खड्डे बुजवतात याचे प्रात्यक्षिकही यावेळी दाखविण्यात आले.

कोणत्याही परिस्थितीत युद्ध पातळीवर प्रयत्न करून गणेश उत्सवापूर्वी रस्त्याची संपूर्ण दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीसाठी सुसज्ञ करण्याचे सक्त आदेश मंत्री महोदयांनी संबंधित विभाग व कंत्राटदारास दिले.

तसेच गणेशोत्सवासाठी येणाऱ्या चाकरमान्यास रस्त्यावरून प्रवास करताना त्रास होणार नाही, याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी आणि रस्ता दुरुस्ती, रस्ता जोडणे, पेव्हर ब्लॉक टाकणे आदि संबंधित कामे तातडीने संपवावीत, असेही सांगितले.

रस्ता दुरुस्ती संदर्भात कोणतेही कारण न सांगता रस्ता दुरुस्ती तातडीने आणि प्राधान्याने व्हायलाच हवी. जेणेकरून कोकणात येणाऱ्या गणेशभक्तांना त्रास होणार नाही यासाठी कामास गती द्यावी. वेगवेगळे कंत्राटदार नेमून त्यांच्यामार्फत ही दुरुस्ती सुरु आहे. केवळ गणेशोत्सव नव्हे तर त्यापुढेही काही काळ रस्ते चांगले राहतील, अशी दुरुस्ती करण्याचे त्यांनी संबंधितास सांगितले. याशिवाय महामार्गाचे राहिलेले काम पावसाळा संपताच तातडीने हाती घेऊन पूर्ण करावे, असेही निर्देश संबंधित विभागाला सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.चव्हाण यांनी दिले.

त्याचप्रमाणे रस्त्यावर अडथळा होऊन वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी पोलीस विभागाने काळजी घ्यावी, अशी सूचना त्यांनी जिल्हा पोलीस विभागाला केली.

मुंबई गोवा महामार्गावरील कॉंक्रिटीकरणाचे काम सध्या युध्द पातळीवर सुरु आहे. परंतु या संदर्भात काही प्रकरणे कोर्टात असल्यामुळे कामाच्या प्रगतीमध्ये अडचण निर्माण होत आहे. तरीही येत्या डिसेंबर अखेरपर्यंत या मार्गातील सर्व अडचणी दूर करुन संपूर्ण मुंबई-गोवा महामार्ग कॉंक्रिटीकरण पूर्ण होईल, असा विश्वास श्री.चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केला.

## कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोल माफीची सवलत

### पासेस, स्टिकर्स पोलीस, परिवहन विभागाकडे उपलब्ध

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना पथकर (टोल) माफी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला असून त्याची अंमलबजावणी शनिवार दि. २७ ऑगस्टपासून करण्यात येत आहे. मुंबई - बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग यावरील आणि इतर सार्वजनिक बांधकाम विभागांच्या रस्त्यांवरील पथकर नाक्यांवर ही सवलत दि. ११ सप्टेंबरपर्यंत असणार आहे.

गेल्या महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफीसह अन्य सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते त्यानुसार आज सार्वजनिक बांधकाम विभागाने पथकर सवलतीचा शासन निर्णय जाहीर केला आहे.

दिनांक २७ ऑगस्ट ते दिनांक ११ सप्टेंबर या कालावधीत मुंबई - बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग (राम-४८), मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग (रा. म. ६६) यावरील व इतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवरील पथकर नाक्यावर कोकणात जाणाऱ्या गणेशोत्सव भाविकांच्या वाहनांना पथकरातून सवलत देण्यात येत असल्याचे शासन निर्णयात म्हटले आहे.

या टोलमाफी सवलतीसाठी गणेशोत्सव २०२२, कोकण दर्शन अशा आशयाचे स्टीकर्स स्वरुपाचे पथकर माफी पास, त्यावर वाहन क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर लिहून ते स्टीकर्स आवश्यक त्या संख्येनुसार परिवहन विभाग, वाहतूक पोलीस/पोलीस, संबंधीत प्रादेशिक परिवहन विभाग (आर.टी.ओ.) यांनी समन्वय साधून पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौक्या व आर.टी.ओ. कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन द्यावेत. हाच पास परतीच्या प्रवासाकरीता देखील ग्राह्य धरण्यात येईल. पोलीस व परिवहन विभागाने गणेशोत्सवाच्या काळात पास सुविधा आणि त्यांच्या उपलब्धतेबाबतची माहिती नागरिकांना देण्याच्या देखील सूचना आहेत.




## हडपसरचे आ.चेतन तुपे यांनी केले रामशेठ ठाकूर यांचे कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने विशेष प्राविण्यासह अव्वल स्थान मिळवत राज्यस्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार २०२१-२२ पटकाविला त्याचबरोबर हा बहुमान मिळवणारे रायगड, नवी मुंबई मधील एकमेव विद्यालय ठरले आहे.

त्या अनुषंगाने रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तसेच हडपसर मतदार संघाचे आमदार चेतन तुपे, पश्चिम विभाग चेअरमन राम कांडगे यांनी आज या विद्यालयाला सदिच्छा भेट देऊन लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच शिक्षक वर्गाचे भरभरून कौतुक केले.



यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या पुणे विभागाचे सहाय्यक अधिकारी शंकर पवार, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, रायगड विभाग पीआरओ बाळासाहेब कारंडे, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या प्राचार्या राज अलोनी, वास्तुविशारद पांचाळ आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार चेतन तुपे, पश्चिम विभाग चेअरमन राम कांडगे तसेच इतर मान्यवरांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ व लोकनेता पुस्तक देऊन स्वागत सत्कार केले.

## कोलाड नाक्याला आले तलावाचे स्वरूप

**दै.रायगड नगरी । रोहा**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरण कामाची पुरती दशा उडलेली दिसत असून प्रमुख रहदारीचे ठिकाण असलेल्या कोलाड नाक्यावर या महामार्गाला तलावाचे स्वरुप आले आहे. परिणामी प्रवाशांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने हायवे प्रशासना विरुद्ध संताप व्यक्त होत आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग रूंदीकरण कामाचे घोंगडे अद्याप भिजतच पडले असल्याने या दिरंगाईच्या कामाचा फटका प्रवासीवर्ग, वाहनचालक व स्थानिक रहिवासी वर्गाला नाहकरित्या सोसावा लागत आहे. कोलाड नाक्यावर महामार्गावरील ठिकठिकाणी असलेल्या खड्ड्यांमुळे नाक्याला बकालावस्था आली असल्याने नाक्याचे खरे रूपच पालटले आहे. पावसाचे पाण्याचे योग्य पद्धतीने निचरा होण्यासाठीचे करण्यात आलेल्या नियोजनाचे अभावामुळे सतत पडणारे पावसाचे पाणी येथे साठून राहत असल्याने

.../२

## अंमली पदार्थ विक्री करताना नायजेरियन इसमाला अटक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा परिसरातून अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या एका नायजेरियन इसमाला अटक करून त्याच्याकडून ५७.५० ग्रॅम वजनाचा एकुण ८,६२,०००/रू चा एमडी (मेफेड्रॉन) हस्तगत केला आहे.

पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह, सह पोलीस आयुक्त डॉ जय जाधव, परि. २ पनवेल पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील, पनवेल विभागाचे सहा पोलीस आयुक्त भागवत सोनवणे यांचे पनवेल व नवी मुंबई शहर नशामुक्त करण्याचे उद्देशाने अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या इसमांविरूध्द कडक कारवाई करण्याचे स्थायी आदेश आहेत. त्यानुसार एक नायजेरियन इसम तळोजा फेज १ शंकर मंदिराचे मागे एमडी हा अंमलीपदार्थ विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सोनवणे यांना मिळताच त्यांच्यासह सपोनि पारासुर, पोउपनि नरेंद्र पाटील व पोहवा सुरेश चौगुले, पोहवा दिपक पाटील,पोना विक्रम राऊत, पोना हरिदास करडे, पोना चंदेवाड, पोना विजय पाटील, पोशि संदेश उत्तेकर, पोशि नितीन गायकवाड, मपोशि प्रतिभा काटे आदींची दोन पदके तयार करून शंकर मंदिराचे मागील रस्त्यावर तळोजा फेज १ येथे रात्रो दोन पंचांचे समक्ष सापळा लावून थांबले. त्यादरम्यान सदर ठिकाणी एक नायजेरियन इसम संशयितरित्या घुटमळताना दिसून आला. त्यास पथकाचे मदतीने ताब्यात घेऊन त्यांची पंचांचे समक्ष झडती घेतली असता सदर इसमांकडे एकूण ५७.५० ग्रॅम वजनाचा एकुण ८,६२,०००/रू चा एमडी (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ मिळून आला आहे. सदर नायजेरियन इसमास ताब्यात घेतले. त्याचे नाव अँनथोनी

.../२

## शिवसैनिकांना दम देण्याची भाषा सोडून द्या; अंगावर आलात तर शिंगावर घेऊ : बबन पाटील



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आमच्या शिवसैनिकांना दम देण्याची भाषा सोडून द्या. अंगावर आलात तर शिंगावर घेऊ याची जाणीव ठेवा असा कडक इशारा आज पनवेल शहर शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील यांनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत विरोधकांना दिला.

या बैठकीला जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील यांच्यासह उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, महानगर प्रमुख एकनाथ म्हात्रे, तालुका प्रमुख विश्वास पेटकर, रघुनाथ पाटील, उपमहानगरप्रमुख शंकर ठाकूर, उपमहानगरप्रमुख संघटक लीलाधर भोईर, पनवेल शहरप्रमुख प्रवीण जाधव, विभागप्रमुख गणेश म्हात्रे, युवासेनेचे नितीन पाटील, पराग मोहिते, जमील खान, वाहतूक सेनेचे महेश गुरव, नरेंद्र सिंग होंटी, अतुल पळण, निखिल भगत, प्रभाकर गोवारी, रामदास पाटील, मुरलीधर म्हात्रे, बाळाराम मुंबईकर, परशुराम गायकर, शांताराम कुंभारकर, प्रमोद पाटील, महेश भोईर, धाया गोवारी, रामदास गोवारी, एकनाथ गोवारी, प्रेम ठाकूर, मा. उपनगराध्यक्ष अनिल टेमघरे, देविदास पाटील, रजनीश पंडित, नरूला वाईकर, कुणाल कुरघोडे, सुफियान मुकादम, रोहित टेमघरे, विजय शेट्ये, लकीत सोडेवाल, जगन्नाथ म्हात्रे यान यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील यांनी सांगितले कि, आज बोटावर मोजण्याइतकी चार जण पक्ष सोडून गेले पण त्यांचे कुटुंब अजूनही शिवसेनेबरोबर आहे. काही गद्दार आमच्या पक्षातील लोकांना धमकवण्याचे, जुन्या केसी-क्लिप बाहेर काढण्याची भाषा करीत आहेत पण अश्या गद्दारांच्या धमक्यांना शिवसैनिक भीक घालत नसून आम्ही बाळासाहेब ठाकरे व उद्धवजी ठाकरे यांचे कट्टर शिवसैनिक आहोत. योग्य वेळी गद्दारांना त्यांची जागा दाखवून देऊ असा इशारा

.../२




राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आज अनेक प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली, त्यामध्ये नवी मुंबई विमानतळचं नामांतर दि.बा. पाटील करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. त्याबद्दल आ.प्रशांत ठाकूर, आ.महेश बालदी, आ.मंदाताई म्हात्रे, आ. राजू पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

# गुण्या गोविंदाने सण साजरे करा : उपायुक्त शिवराज पाटील



**दै.रायगड नगरी । उरण**

डीजे लाऊन ध्वनिप्रदूषण करणाऱ्या, गणपतीच्या मंडपात जुगार पत्ते खेळणाऱ्या आणि समाजात तेढ निर्माण होईल अशी आर–ास–देखावे उभारणाऱ्या मंडळावर गुन्हे दाखल करण्यात येतील अशी सक्त ताकीद देतानाच गणेशोत्सव साजरा करताना आपल्या बेकायदा कृतीतून सणाला गालबोट लागणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन डिसीपी शिवराज पाटील यांनी उरण येथे केले.

दोन वर्षानंतर निर्बंधमुक्त वातावरणात गणे–शोत्सव साजरा करण्यात येतो आहे. त्यामुळे सर्वत्रच उत्साहाचे वातावरण आहे.या उत्सव साजरे करताना उरण तालुक्यातील नागरिक, गणेश मंडळांना कोणत्या समस्या भेडसावत आहेत आणि त्या दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत यासाठी बुधवारी (२४) संध्याकाळी डिसीपी शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उरण पोलिसांनी आनंदी हॉटेलमधील हॉलमध्ये आयोजित केलेल्या बैठकीसाठी न्हावा–शेवा बंदर विभागाचे एसीपी धनाजी क्षीरसागर,उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील, न्हावा–शेवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे, उरण मुख्याधिकारी संतोष माळी, उरण महावितरणचे उप अभियंता विजय सोनवणे, नायब तहसीलदार नरेश पेडवी, द्रोणागिरी अग्निशमन केंद्र सिडको उरण चे अमित कांबळी व उरण तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे, गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध शासकीय कमिट्याचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

या बैठकीत प्रामुख्याने वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, बेकायदेशीर पार्किंगमुळे होणारे वाहतूक कोंडी, भटकी कुत्री– मोकाट गुरे, खड्डेमय रस्ते, तलाव, समुद्र या विसर्जन ठिकाणी होणारी गर्दी यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरुन जणू तक्रारींचा पाऊसच पाडला. नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी नेहमी सारखी गोलमाल उत्तरे देऊन वेळ मारुन नेली.

गणेशोत्सवाला कुठल्याही प्रकारे गालबोट लागणार याची सर्वांनी च दक्षता घेण्याचे आ–वाहन डिसीपी शिवराज पाटील यांनी मार्गदर्शन करताना केले. डिजेच्या आवाजाने ध्वनी प्रदुषण होणार नाही याची दक्षता घ्यावी, गणपतीच्या मंडपात जुगार, पत्ते खेळणे बेकायदेशीर आहे. दारुड्यांचा धिंगाणा आवरण्याची जबाबदारी त्या त्या गणेश मंडळाची आहे. विद्युत रो–षणाई करताना काळजी घेण्याची आवश्यकता आहे.समाजात तेढ निर्माण होईल, भावना दुखावल्या जातील असे देखावे, कार्यक्रम आयोजित करणाऱ्या आयोजकांची गय केली जाणार नसल्याचे सक्त ताकीद देतानाच अशी बेकायदा कृत्ये करणाऱ्या गणेश मंडळांवर गुन्हे दाखल करण्यात येतील असा सक्तीचा इशाराही शिवराज पाटील यांनी दिला.

# भगतवाडी समोरील रस्ता पुन्हा खड्ड्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील सुकापुर–भगतवाडी येथील रस्ता पुन्हा खड्ड्यात गेला आहे. काही दिवसांपूर्वी सामाजिक कार्यकर्त्यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने येथील खड्डे थातूर मातुर पद्धतीने बुजवले होते. मात्र पुन्हा हा रस्ता खड्ड्यात गेला आहे.

सुकापुरपासून पुढे असलेला रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येतो. भगतवाडी येथील रस्ता संपूर्ण खड्डेमय झाला आहे. त्यामुळे येथून प्रवास करताना होडीत बसल्यासारखी जाणीव होते. या रस्त्यावरील संपूर्ण डांबर वाहून गेलेली आहे. खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावतो व वाहतूक कोडी होते. दरवर्षी हा प्रकार येथे पावसाळ्यात पाहायला मिळतो मात्र यावर सार्वजनिक बांधकाम विभाग काहीही उपाययोजना करताना दिसून येत नाही. केवळ खडी टाकून येथील खड्डे बुजवले जातात. यावर्षी थोड्याफार प्रमाणात पेवर ब्लॉक खड्ड्यात लावले मात्र तेही काही प्रमाणात बाहेर पडले. त्यामुळे नेहमीची येतो पावसाळा या उक्तीप्रमाणे नेहमीची भगतवाडी समोरील रस्त्यावर पडतात खड्डे असं म्हणावं लागेल. सुकापुर पासून पुढे मोठ्या प्रमाणात लोक वस्ती वाढली आहे याच रस्त्यातून मोठ्या प्रमाणावर नागरिक वाहनाने प्रवास करतात. मात्र सर्वांना खड्ड्यांचा त्रास सहन करावा लागतो.

सरकारी काम आणि सहा महिने थांब याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग या खड्ड्यांकडे दुर्लक्ष करताना करत आहेत. पावसाचे पाणी जाण्यासाठी कोणतेही उपाययोजना केलेला नसल्याने रस्त्यावर पाणी साचते व त्यामुळे खड्डे पडतात. त्यामुळे दरवर्षी पडणाऱ्या खड्ड्यातून नागरिकांची मुक्तता व्हावी यासाठी येथे रस्ता सिमेंट काँक्रीटचा करावा अशी मागणी केली जात आहे.

# नागोठण्यात पर्यावरण पुरक गणपती व गौरी आरास सजावट स्पर्धा

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रायगड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार सुनील तटकरे यांच्या आशिर्वादाने तसेच रायगड जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री, आमदार कु.आदितीताई तटकरे व आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या संकल्पनेतुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, नागोठणे व सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान यांच्या वतीने नागोठणे शहरात प्रथमच पर्यावरण पुरक गणपती व गौरी आरास सजावट (मकर) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

नागोठणे शहर मर्यादित असलेल्या या आरास स्पर्धेत स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव (देशभक्तीपर) दाखविणारी सजावट, नागोठण्याचे वैशिष्ट्ये वर्णन करणारी सजावट, पर्यावरण विषयक जागरूकता दाखविणारी सजावट तसेच ऐतिहासिक, पौराणिक व धार्मिक गोष्टींवरील सजावट हे विषय ठेवण्यात आले आहेत.

यांतील गणपती आरास स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकासाठी अनुक्रमे ५ हजार, ३ हजार व २ हजार व आकर्षक चषक तसेच दोन उत्तेजनार्थ पारितोषिक विजेत्यांसाठी प्रत्येकी १ हजार व आकर्षक चषक तसेच गौरी सजावट स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकाच्या विजेत्यांसाठी अनुक्रमे ३ हजार, २ हजार, १ हजार तर एक उत्तेजनार्थ साठी १ हजार व प्रत्येकास आकर्षक चषक देण्यात येणार आहे.

या आरास स्पर्धेत प्रवेश घेण्यासाठी ३० ऑगस्ट ही अंतिम तारीख असून अधिक माहितीसाठी अक्षय नागोठणेकर (९०११२१८१४९) केतन भोय (९०७०३९९९१२) प्रथमेश काळे (९०९६०३८८८०) दिनेश घाग (९१५८९६१७१७) यांच्याशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले आहे. या पर्यावरण पुरक आरास स्पर्धेत अधिकाधिक नागरिकांनी व महिलांनी सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे शहर अध्यक्ष बाळासाहेब टके व महिला आघाडी शहर अध्यक्षा सुजाता जवके यांनी केले आहे.

# रानडुकरे व वानरे यांच्या हल्ल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील बागायतदार व शेतकरी हवालदिल

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

रानडुकरांच्या व वानरांच्या प्रादुर्भावामुळे श्रीवर्धन तालुक्यातील बागायतदार व शेतकरी हवालदिल झाल्याचे पाहायला मिळत आहे. निसर्ग चक्रीवादळा मध्ये बागायतदारांच्या बागायती मधील नारळ व सुपारीची अनेक झाडे पडून गेली. नारळाची व सुपारीची रोपे तयार करण्यासाठी नारळ किंवा सुपारी जमिनीमध्ये टाकल्यानंतर त्याला आलेले कोंब रानडुकरे खात असल्याचे निदर्शनास येत आहे. रानडुक्करा सोबतच वानर देखील अशा प्रकारचे कोंब खाताना पाहायला मिळत आहेत.

तसेच केळीच्या झाडाला लागलेली लोंगर वानरांच्या टोळ्या फस्त करून टाकत आहेत. तसेच रानडुकरा कडून भातशेतीचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. आता काही दिवसातच भात पीक पसावेल व त्याला नवीन दाणा येईल. यावेळी रानडुकरे भात शेती वरती हल्ला करून नवीन आलेले भाताचे दाणे खातात. शिवाय शेतामध्ये लोळून पूर्णपणे भात झोपवून टाकतात.

दिवेआगर परिसरात हा प्रकार जास्त होत असल्याने, दिवे–आगर मधील सामाजिक कार्यकर्ते व शेतकऱ्यांचे कैवारी उदय करमरकर यांनी एक प्रसिद्धीपत्रक काढून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे वन विभागाने पंचनामे करावेत व नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली आहे.

# पोलीस खात्यात भरती करतो असे सांगून लाखोंची फसवणूक

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माझी पोलीस खात्यात ओळख असून पोलीस खात्यात भरती करतो असे खोटे सांगून लाखो रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तरपणे असे की, आरोपी सुजित कृष्णा गोगावले रा. कामठे, ता. पोल–ादपूर याने फिर्यादी विराज विनोद सावंत वय २५ वर्ष, मूळ रा. मु.पो. आंबेत याना माझी पोलीस खात्यात वरिष्ठ अधिकारी यांच्या सोबत चांगली ओळख नसून फिर्यादी याना फिर्यादी याना पोलीस खात्यात भरती करतो असे खोटे बोलून विराज सावंत यांच्याकडे ४५०००० रु. मागणी केली. व तात्काळ २००००० रु. द्यायचे आहेत असे बोलून फिर्यादी यांच्याकडून २००००० घेऊन फसवणूक केली.

या गुन्ह्याची नोंद माणगांव पोलीस ठाण्यात कॉ. गु. र. नं. २४५/२०२२ भा. दं. वि. सं. क. ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पो. नि. राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स. पो. नि. अस्वार करीत आहेत.

# जीवनविद्या मिशनचे दत्तक गावात वृक्षारोपण



**दै.रायगड नगरी । कर्जत**

सद्गुरु श्री वामनराव पै यांनी पर्यावरणाचे महत्त्व सांगताना 'पर्यावरण हाच नारायण' असा दिव्य विचार दिला आहे. जीवनविद्या मिशन ही संस्था हे वर्ष श्री सद्गुरू जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करीत आहे. त्यानिमित्ताने जीवनविद्या मिशनच्या दादर शाखेने दत्तक घेतलेल्या तालुक्यातील वैजनाथ गावात १६० रोपांचे वृक्षारोपण केले.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांनी अनेक समाजाभिमुख उपक्रम आयोजित करण्याचे आवाहन केले होते या आव्हानाला प्रतिसाद देण्यासाठी जीवनविद्या मिशन दादर शाखेने ग्राम समृद्धी अभियानाअंतर्गत दत्तक घेतलेल्या कर्जत वैजनाथ या गावात वृक्षारोपणाचा उपक्रम राबवण्यात आला. भारतमाता ही सुजलाम सुफलाम व्हावी या उद्देशाने जीवनविद्या मिशन दादर शाखेने १६० रोपांचे वृक्षारोपण केले या उपक्रमाला गावातील सर्व ग्रामस्थांचा उदंड प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी सरपंच स्नेहल गुरव , दादर शाखेचे अध्यक्ष मिलिंद डिचोलकर, सचिव सुजित धावडे, ग्राम सेवक अरुण राजपूत , ग्राम पंचायत सदस्य सुमती साळोखे, वनरक्षक कविता राठोड, तसेच नामधारीका लक्ष्मी भोवड, स्नेहा माधव, उर्मिता राणे उपस्थित होते.

# पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीद्वारे चार शाळांचे दुरूस्तीचे काम पूर्ण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

पॉस्को महाराष्ट्र स्टील प्रा. लि. कंपनीने त्यांच्या सी.एस.आर. उपक्रमांतर्गत चार शाळांच्या इमारतीची दुरुस्ती केली, यामध्ये कसबेवाडी, येलावडे, तासगांव आणि उंबर्डी या रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांचा समावेश आहे. माणगांवच्या पूर्वीच्या गटशिक्षणाधिकारी आणि रायगड जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शाळा दुरुस्तीची विनंती केली होती. जून २०२० च्या निसर्ग चक्रीवादळात शाळेचे मोठे नुकसान झाले होते, शासनाच्या अनुदानाअभावी दुरुस्तीचे काम प्रलंबित होते. तालुक्यातील अनेक शाळांच्या इमारतींची अवस्था बिकट झाली असून, काही शाळांची दुरुस्ती झाली असली तरी अजून बऱ्याच शाळांच्या इमारती अद्याप नादुरुस्त आहेत.

तासगांव आणि उंबर्डी या दोन शाळेच्या नुतनीकरण केलेल्या इमारतींचा उद्घाटन सोहळा दिनांक २५ ऑगस्ट २०२२ रोजी पोस्को कंपनीचे अधिकारी जसे कि कंपनीचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर, जनरल मॅनेजर, प्रशासन विभागाचे प्रमुख, सी.एस.आर. विभागाचे अधिकारी तसेच सरपंच, ग्रामसेवक, शाळेतील मुले व त्यांचे पालक आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत पार पडला.

याप्रसंगी पोस्को कंपनी व्यवस्थापन म्हणाले कि, पॉस्को महाराष्ट्र स्टील आपल्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमात सातत्याने पुढाकार घेत आहे. हे कार्य, समाजात शिक्षणाला प्रोत्साहन देण्याची आमची बांधिलकी दर्शवते. या नूतनीकरण केलेल्या शाळेमुळे ज्ञान मिळविण्यासाठी येथे उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर सकारात्मक प्रभाव कायम राहील. शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी तालुका स्तरीय सरकारी अधिकारी व ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

याप्रसंगी शिक्षक व ग्रामस्थांनी पोस्को कंपनीच्या शाळा दुरुस्ती तसेच अन्य उपक्रम जसे शैक्षणिक साहित्य वाटप, फळझाडे वाटप, बेटी बचावो बेटी पढाओ अशा विविध उपक्रमांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत पुढील काळातही अशाच समाजाभिमुख उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## कोलाड नाक्याला आले तलावाचे स्वरूप

या नाक्यावर अक्षरशः तळेच तुंबळे आहे. तुंबळेले तळे हे नाक्याच्या मध्यभागी असल्याने याचा त्रास नाहकरित्या सर्वांना सोसावा लागत आहे. तर येथेच दोन्ही बाजूला बसचा थांबा असल्याने येणा–या जाणा–या वाहणांचे टायरमधून चिखलमिश्रीत पाणी उडत असल्याने प्रवासीवर्गाचा जलाभिषेकही होत आहे. पावसाळ्याला सुरुवात झाल्यापासून येथे ही समस्या निर्माण झाली असल्याची माहिती असून देखील हायवे प्रशासन डोळेझाक करीत आहे. गणेशोत्सव सण तोंडावर आला असताना येथील समस्या मात्र जैसी थेच असल्याने सुस्त प्रशासनाबद्दल सर्वच स्तरातून प्रचंड नाराजीचा व्यक्त होत आहे.

## अंमली पदार्थ विक्री करताना नायजेरियन इसमाला अटक

नैईमेका ओकोली वय–३६ वर्षं, धंदा– कपडे विक्री, रा– सेक्टर ३६ खारघर, मुळ रा – ओनिस्था, नायजेरिया असे समजले व त्याच्याकडून ८,६२,०००/ रू किमतीचे दोन वेगवेगळ्या पारदर्शक प्लास्टिकच्या पिशवीमध्ये अनुक्रमे ४०.५० ग्रॅम वजनाचा व १७.०० ग्राम वजनाची भुरकट रंगाची लहान खडे मिश्रित पावडर एमडी (मेफेड्रॉन) व १०००/ रू ५०० रू दराच्या दोन भारतीय चलनाची नोटा असा एकूण ८,६३,०००/रू चा वरील प्रमाणे मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सपोनि सुनील गुरव हे करीत आहेत.

## शिवसैनिकांना दम देण्याची भाषा सोडून द्या; अंगावर आलात तर शिंगावर घेऊ : बबन पाटील

त्यांनी देऊन शिवसैनिकांनी न घाबरता कामाला लागावे, मेळावे, बैठका घ्याव्यात, नाराज लोकांशी संपर्क साधा व आपली ताकद वाढवा असे आवाहन त्यांनी केले. तर यावेळी बोलताना महानगरप्रमुख एकनाथ म्हात्रे यांनी सांगितले कि, एक बाप सोडून पाच बाप असलेल्या लोकांकडे हे गद्दार गेले असून त्यांच्या आमिषाला शिवसैनिकांनी बळी पडू न नये असे आवाहन त्यांनी केले.

शिवसेना पक्षप्रमुख मा.मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रथम पुढाकार घेतल्यामुळे व त्यांनी ठराव केल्यामुळेच आज सत्ताधारी पक्षाने नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव केंद्रीय नागरी विमानउड्डाणमंत्रालयाला पाठवण्याचा ठराव विधानसभेत एकमताने मंजूर केला याचे सर्व श्रेय शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांचे असून त्यांचे अभिनंदन सर्वानी बैठकीत केले.

## ग्रामपंचायत आकुर्ली
### ता.पनवेल, जि.रायगड

जा.क्र.१८१/ग्रा.पं./आस्था २०२२
ग्रामपंचायत आकुर्ली
दि.२६/०८/२०२२

यद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलांचे ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी नोंद वहितील नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**(वाचा : मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ८ नियम ३२ (१))**

| अ.क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट/ सदनिका/गाळा नं. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C2/१०२ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | वैष्णवी श्रीधर नाईक |
| २ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C1/१०२ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | ज्योती अश्विनी शारदा |
| ३ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C3/१०१ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | नारायण मनोहर पाटील अभिलाषा नारायण पाटील |
| ४ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C1/१०१ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | मिनाक्षी लालसिंग गुजर लालसिंग रामचंद्र गुजर |
| ५ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C1/१०४ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | प्रियंका प्रकाश सुतार प्रकाश सहदेव सुतार |
| ६ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C3/१९ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | सचिन सिताराम आंब्रे रश्मी सिताराम आंब्रे |
| ७ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C1/२०१ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | रसिका चोपशी देढीया |
| | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C1/२०१ | रसिका चोपशी देढीया | जयदेव हरिराम डागर कल्याणी जयदेव डागर |
| ८ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C3/१०४ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | कांतीलाल उमरशी देढीया, प्रमिला कांतीलाल देढीया, राजेश देढीया, मनोज देढीया |
| | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C3/१०४ | कांतीलाल उमरशी देढीया, प्रमिला कांतीलाल देढीया, राजेश देढीया, मनोज देढीया | नेहा अभिजीत बाबर |
| ९ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C2/२०२ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | सिमा राजेंद्र शाहू राजेंद्र छगनलाल शाहू |
| | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C2/२०२ | सिमा राजेंद्र शाहू राजेंद्र छगनलाल शाहू | शिवकुमार विनेश्वर सिंग सुमन शिवकुमार सिंग |
| १० | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C1/२०४ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | रसिका चोपशी देढीया |
| | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C1/२०४ | रसिका चोपशी देढीया | श्रीकांत विनायक काजळे |
| ११ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C3/१०३ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | भक्ती अश्विन शारदा |
| | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C3/१०३ | भक्ती अश्विन शारदा | सार्थक सुनील प्रभू स्नेहा सार्थक प्रभू |
| १२ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C3/२०३ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | हिना जिगर शाहू |
| | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C3/२०३ | हिना जिगर शाहू | विष्णू वामनराव हिवरे वर्षा विष्णू हिवरे |
| १३ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C3/००१ | मातेश्वरी हाऊसिंग एलएलपी तर्फे भागीदार श्री.परेश बाबुलाल पटेल | जिगर गिरीश शाहू |
| | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C3/००१ | जिगर गिरीश शाहू | लालजी यादव राजकुमारी लालजी यादव |
| १४ | | ओमकार रेसिडेन्सी आकुर्ली ३९६/H/२०५ | वैभव अरुण केदारी | रवींद्र रामचंद्र मोहिते सुचित्रा गंगाराम जाधव |
| १५ | | सुप्रिम होल्डिंग्स आकुर्ली ४०९/B/१०३ | सुप्रिम होल्डींग ॲण्ड हॉस्पिलिटी इं.लि. तर्फे विदीप जेठीया क.ज.मु.धारक उमेश आडे | बाळकृष्ण विनायक पेडणेकर स्नेहल बाळकृष्ण पेडणेकर |
| १६ | | सुप्रिम होल्डिंग्स आकुर्ली ४०९/A/२०३ | सुप्रिम होल्डींग ॲण्ड हॉस्पिलिटी इं.लि. तर्फे विदीप जेठीया क.ज.मु.धारक उमेश आडे | प्रियंका यशवंत पाटील जयेश मधुकर खोत |
| १७ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/G/२४०५ | मे.बालाजी सिम्फोनी तर्फे विनय श्रवणकुमार अग्रवाल | शिवाजी मारुती भागवत शुभम शिवाजी भागवत |
| १८ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/G/२७०३ | विधान बिस्वास सन ऑफ बितुश बिस्वास | भास्केर शांदिल्या |
| १९ | | अपेक्षा कॉम्प्लेक्स आकुर्ली २०७ ब/E/१०१ | कुसुम संजय वाघमारे | शहारुख पापाभाई खोत |
| २० | | अपेक्षा कॉम्प्लेक्स आकुर्ली २०७ ब/D/१०३ | उमाकांत महादेव पावले | शिवाजी लक्ष्मण शिर्के सुनील शिवाजी शिर्के |
| २१ | | अपेक्षा कॉम्प्लेक्स आकुर्ली २०७ ब/J/०७ | नंदा पांडुरंग मोहिते | रोशना रणजित कदम रणजित एस कदम |
| २२ | | कपालेश्वर अपार्टमेंट आकुर्ली ३६९/१०३ | जि.के.बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स तर्फे पार्टनर श्री.शिवदास पदू म्हात्रे | राजकुमार मालती देवी |
| | | कपालेश्वर अपार्टमेंट आकुर्ली ३६९/१०३ | राजकुमार मालती देवी | नरेश गणपत बाबरे वनिता नरेश बाबरे |
| २३ | | अपेक्षा कॉम्प्लेक्स आकुर्ली २०७ ब/I/२०१ | निशिकांत माधवराव कांबळे | श्रीकांत कृष्णाजी पेडणेकर आनंद श्रीकांत पेडणेकर |

वरील बाबत प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्याच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसाचे आत ग्रामपचांयत आकुर्ली कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे बदल करणेत आल्यानंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरण मुंबई ग्रामपंचायत अधिनियम प्रकरण ८ नियम ३२ (१) नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**सौ.भारती सचिन पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/–**
**श्री.जयेंद्र घनशाम म्हात्रे**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रूपाली देवकर यांची शास्त्रीय सल्लागार समितीवर सदस्य शेतकरी म्हणून नियुक्ती

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील क्रुषीनिष्ठ बाहे गावातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या रूपाली सचिन देवकर यांची शास्त्रीय सल्लागार समितीवर सदस्य शेतकरी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली संलग्न असणाऱ्या क्रुषी विज्ञान केंद्र किल्ला रोहा येथील शास्त्रीय सल्लागार समितीवर त्यांची नियुक्ती करण्यात आली असून तशाप्रकारचे नियुक्ती पत्र एका कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र किल्ला रोहा यांच्याकडून देण्यात आले आहे. रूपाली देवकर यांचे शिक्षण शिक्षण पदवीपर्यंत झाले असून त्या उत्तम ग्रुहीणी आहेत. तसेच आपल्या पतीच्या बरोबर शेतीच्या कामातही चांगले सहकार्य करतात.

खरीप हंगामात भात लागवड व रब्बी हंगाम भाजीपाल्याचे पिक घेऊन त्यांनी चांगला आदर्श निर्माण केला आहे. तसेच त्यांचा बचत गट, शेतकरी संघटना कार्यक्रमात सक्रीयसहभागी असतो.तर त्यांना समाज सेवेचीही त्यांना विशेष आवड आहे.

त्याचप्रमाणे त्यांचा बळीराजा शेतकरी सामाजिक संस्थेच्या वतीने कृषल शेतकरी म्हणूनही सत्कार करण्यात आला आहे.

त्यांचे शेती विषयक ज्ञान लक्षात घेऊन तसेच विविध क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांची ही नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या या नियुक्तीचे ग्रामस्थ व महिला मंडळ बाहे तसेच तरुण मंडळ बाहे यांच्यासह समाजातील सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन व्यक्त होताना दिसत आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची वाट बिकट ; दलदलीतून मार्गक्रमण करीत गाठावी लागते शाळा

**दै.रायगड नगरी । उरण**

देशाचा अमृत महोत्सव नूकताच देशवासियांनी मोठ्या उत्साहात घर घर तिरंगा ध्वज फडकावून साजरा केला आहे.परंतु स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही आदिवासींच्या वाड्या वस्त्यांवर साधा रस्ता झालं नसल्याने आजही चिरनेर सारख्या ऐतिहासिक गावातील आदिवासी वाड्यांवरील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दलदलीच्या रस्त्यातून चिखल तुडवीत शाळा गाठावी लागत आहे.हि खरी शोकांतिका आहे.

इंग्रज राजसत्ते विरुद्ध १९३० साली चिरनेर परिसरातील जनतेने आपल्या मातूभूमिच्या रक्षणासाठी लढा उभारला होता.अशा चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या लढ्यात आठ शुर पुरुषांना हुतात्म्य प्राप्त झाले होते. या लढ्यात नाग्या महादू कातकरी हा कातकरी आदिवासी तरुण हुतात्मा झाला होता. मात्र त्याच्या वारसांना स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही राहायला घर नाही. कि पिण्यास पाणी नाही.तसेच गावांना जोडणारा रस्ता नाही. त्यामुळे अमुत महोत्सवांनंतर ही त्यांच्या नशिबात आजही संघर्ष करावा लागत आहे.

स्वातंत्र्य लढ्यातील सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवलेल्या चिरनेर ग्रामपंचायत हद्दी मधिल केळाचामाल व चांदायणी आदिवासी वाडीवर कातकरी समाजाची मोठी वस्ती आहे.मात्र चिरनेर ग्रामपंचायतीच्या उदासीन व दुर्लक्षित कारभारामुळे या आदिवासी वाड्यांपर्यंत अजूनही पक्का रस्ता होऊ शकला नाही की येथील आदिवासी बांधवांना शुद्ध पाणीपुरवठा उपलब्ध झाला नाही. परिणामतः या आदिवासी बांधवांना खूप अडचणीचा सामना करावा लागत आहे. केळाचा माळ व चांदायणी या आदिवासी वाडी वरील मुलांना आपल्या माध्यमिक शिक्षणासाठी दगड मातीच्या रस्त्यातून चिखलाची दलदल तुडवीत रोज सुमारे तीन किमी ची पायपीट करावी लागत असल्याने या विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे कष्टमय झाले आहे. अशी संतप्त भावना आदिवासी बांधव व्यक्त करत आहेत.



चिरनेर गाव ते केळाचा माळ आदिवासी वाडी पर्यंतच्या रस्त्यासाठी रायगड जिल्हा परिषदे कडून सुमारे १३ लाखांचा निधी मंजूर झाला होता.मात्र चिरनेर ग्रामपंचायतीच्या उदासीन कारभारामुळे या रस्त्याचे काम होऊ शकले नाही. या बाबत आदिवासी समाजाने वारंवार पाठपुरावा करूनही त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले गेले. या आदिवासींच्या प्रगतीला खीळ घालणाऱ्या चिरनेर ग्राम पंचायतीच्या भोंगळ कारभारा विरोधात आदिवासी समाजात आज ही संताप व्यक्त करण्यात येत आहे.

तरी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच आमदार महेश बालदी यांनी लक्ष केंद्रित करावे अशी मागणी या आदिवासी वाडीवरील बांधव व्यक्त करत आहेत.

# सात वाहनांचे काचा फोडून म्युझिक सिस्टमसह गाडीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर सेक्टर १२ आणि १८ मध्ये अज्ञात चोरट्यांनी वाहनांच्या काचा फोडून म्युझिक सिस्टीमची चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या वेळी चोरट्यांनी रस्त्यावर उभी असलेली सात वाहने फोडली. तसेच गाडीही चोरट्यांनी चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

खारघर परिसरात भाड्याने राहणाऱ्या वाहनमालकांना सोसायटीत पार्किंग नसल्याने वा-हने रस्त्यावर उभी करावी लागतात. सोसायटीबाहेर वाहने उभ्या असलेल्या अशाच सात वाहनांच्या काचा एकाच वेळी फोडण्यात आल्या आहेत.

चोरट्यांनी वाहनातील म्युझिक सिस्टीम आणि इतर काही वस्तू चोरून नेल्या आहेत. तसेच खारघरमधील भूमिका हेमंत वाडकर यांची घरासमोर उभी केलेली गाडीही चोरट्यांनी नेल्याची तक्रार पोलिस ठाण्यात दाखल आहे.

# टॅक्सीचालकाने एक इसमास मारहाण करून केला डोळा निकामी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका टॅक्सीचालकाने मनात राग धरून एक इसमास शिवीगाळ व हाता-चापाट्याने मारहाण करून तसेच त्या इसमाच्या उजव्या डोळ्यावर बुक्की मारून त्याचा डोळा निकामी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

मधुकर अवघडे (वय ६२), हे काळुंद्रे गावातील ओएनजीसी पेट्रोल पंपावरून गाडीत पेट्रोल भरून बाहेर पडत असताना एका काळ्या पिवळ्या टॅक्सची गाडी त्यांच्या गाडी पुढे आल्याने त्यांना पुढे जाण्यास जागा नसल्याने त्याने त्यांच्या दुचाकीला ब्रेक मारला असता त्यात त्यांचा तोल जाऊन ते गाडीसह खाली पडले यावेळी त्यांनी टॅक्सी चालकाला तुला दिसत नाही का ? तू गाडी कशी चालवतो असे बोलले असता त्याचा राग मनात राग धरून शिवीगाळ व हाता-चापाट्याने मारहाण केली तसे उजव्या डोळ्यावर बुक्की मारून त्याचा डोळा निकामी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

# राष्ट्रवादी महिला काँग्रेसतर्फे मंगळागौर स्पर्धा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

राष्ट्रवादी महिला काँग्रेस उरण तालुका तर्फे महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर यांच्या अध्यक्षतेखाली आनंदी हॉटेल कोटनाका उरण येथे मंगळागौर स्पर्धा २०२२ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते . यावेळी या स्पर्धेला महिलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे . स्पर्धेसाठी महिला सक्षमीकरण, पर्यावरण विषयक जागरूकता, व्यसन मुक्ती, आरोग्यविषयक जागरुकता आदि विषय ठेवण्यात आले होते.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित मंगळागौरी स्पर्धेत प्रथम क्रमांक जिजाऊ ग्रुप,द्वितीय क्रमांक उरण ब्राह्मण महिला शाखा,तृतीय क्रमांक एकविरा महिला नाच मंडळ मोठी जुई, चतुर्थ क्रमांक जोगेश्वरी महिला नाच मंडळ जासई तर उत्तेजनार्थ दोन बक्षीसे देण्यात आली.कुलदैवत महिलां नाच मंडळ मोठी जुई, मी मराठी महिला नाच मंडळ मोठी जुई यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.

सदर स्पर्धेत प्रथम येणाऱ्या ग्रुपला बक्षीस म्हणून दहा हजार रुपये, द्वितीय सात हजार रुपये , तृतीय पाच हजार रुपये , चतुर्थ तीन हजार रुपये व सहभागी प्रत्येक संघांना (ग्रुपला) दोन हजार रुपये देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, सरचिटणीस कुंदा ठाकूर, उरण तालुकाध्यक्ष हेमांगी पाटील, शहराध्यक्ष संध्या घरत, उपाध्यक्ष- कलावती भोईर, रेश्मा म्हात्रे, किंजल भोईर, अनिता मळेकर, स्वाती नलावडे. सामाजिक कार्यकर्त्या सीमा घरत आदी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे गणेश नलावडे, सचिन पाटील यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

# अज्ञात इसमाचा आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील विश्राळी तलाव येथे एका इसमाचा मृतदेह आदळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सदर इसमाचे अंदाजे वय ३५ ते ४० वर्षे, डोक्याचे केस काळे असून मयताच्या उजव्या हातात काळसर मण्यांची माळ, अंगात चॉकलेटी रंगाची अंडरवेअर घातलेली आहे.

या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे फोन नं. ०२२-२७४५२३३३ किंवा सहा. पोलीस निरीक्षक शरद ढोले यांच्याशी संपर्क साधावा.

# पनवेल परिसरात दोघांची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात दोन वेगवेगळ्या घटनेत दोघा जणांनी आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

शहरातील सूर्या गेस्ट हाऊस येथे रूम नं.२०१ येथे कोणत्यातरी अज्ञात कारणावरून रूममधील बेडवरील बेडशीटने सिलिंग फॅनला गळफास घेऊन विष्णू एन के (वय २६ वर्षे), राहणार सुकापूरम केरळ, यांनी आत्महत्या केली आहे. तर दुसऱ्या घटनेत तक्का येथील १८ वर्षीय रोहन बहिरा या तरुणाने गळफास घेतल्याची घटना घडली. त्याने नायलॉनच्या दोरीने वाशाला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

आत्महत्या करण्याचे कारण अस्पष्ट असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या दोन्ही आत्महत्येची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यांत करण्यात आली आहे.

**ॲड.अजित म्हात्रे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

क्रि.एम.ए.९२७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०९/२०२२

श्री.दिलीप सिताराम पाटील — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, नावडे विभाग
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ — सामनेवाला

ज्याअर्थी कै.लक्ष्मीबाई सिताराम पाटील हे दि.२३/०७/२०२० रोजी मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर कै. लक्ष्मीबाई सिताराम पाटील यांचे मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर कै.लक्ष्मीबाई सिताराम पाटील हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२६/०८/२०२२ रोजी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलांने खरेदीखत करून प्रस्ताविक जमीन मालक १) वत्सला ज्ञानेश्वर शेळके, २) सौ.द्रवीशा समीर ठाकूर, ३) श्री.प्रल्हाद ज्ञानेश्वर शेळके, ४) सौ.प्रतिज्ञा कांचन पाटील या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर वर्णनित जमीन मिळकत ही १) वत्सला ज्ञानेश्वर शेळके, २) सौ.द्रवीशा समीर ठाकूर, ३) श्री.प्रल्हाद ज्ञानेश्वर शेळके, ४) सौ.प्रतिज्ञा कांचन पाटील यांच्या प्रत्यक्ष वहिवाटीत व ताबेकब्जात आहे. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चिंचवली तर्फे वाजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| चिंचवली तर्फे वाजे | ३०/२ | ०-९४-४०<br>पो.ख.०-०२-८०<br>एकूण ०-९७-२० | ८.७८ |
| वरील वर्णनित मिळकती पैकी एकपक्षी यांच्या ताबेकब्जात व नावे असलेली ०-४६-५० हे.आर.पॉ. आकार ४.३२ रु.पैसे या मिळकती पैकी २८ गुंठे मिळकतीच्या विक्रीबाबत सदर जाहीर नोटीस | | | |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.२६/०८/२०२२

**सही/-**
**ॲड.श्री.महेंद्र अनंता पाटील**
**डी/३/१, किनारा को.ऑप. हौ.सो., बावन बंगला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०७९५६०५**

मे.मुजावर साहेब कोर्ट

**अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१२२१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०९/२०२२

१) सौ.शर्मिला शशिकांत पालशेतकर, वय : ६६ वर्षे
रा.जी.२९, २ रा मजला, ताराबाग इस्टेट,
चर्नी रोड, गिरगांव, मुंबई ४००००४
२) श्री.सुधीर शंकर बहाडकर, वय : ६० वर्षे
रा.शकुन को.हौ.सोसायटी, फ्लॅट नं.३०२,
टिळक रोड, जयभारत नाका, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.अश्विनी अरविंद मोहरे, वय : ६० वर्षे
रा.सरस्वती कुंज-११५, रुम नं.१,
संत गोराकुंभार मार्ग, भुजल तलाव समोर,
कुंभारवाडा, मालाड (प.), मुंबई ४०००६४
४) सौ.मानसी महेंद्र बहाडकर, वय : ६२ वर्षे
५) कु.नुतन महेंद्र बहाडकर, वय : ३७ वर्षे
६) श्री.परिक्षित महेंद्र बहाडकर, वय : ३५ वर्षे
क्र.४, ५ व ६ रा.जी.-वॉर्ड, रुम नं.२०३९,
शिव कॉलनी रोड, प्यारेलाल प्रजापती हॉल जवळ,
सेक्टर क्र.१, ऐरोली, नवी मुंबई, ठाणे ४००७०८
७) श्रीमती.सुवर्णा संजय बहाडकर, वय : ५३ वर्षे
८) सौ.विभा कैलास गायकर, वय : ३२ वर्षे
क्र.७ व ८ रा.रुम नं.८, रुक्मिणी अपार्टमेंट,
हनुमान मंदिरा समोर, शिवाजी रोड,
लाईन आळी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
९) सौ.वैष्णवी नकुल हळणकर, वय : २८ वर्षे
रा.बी-३०९, ३ रा मजला, निसर्ग एस.आर.ए.
को.ऑप.हौ.सोसायटी, जेरबाई वाडी रोड,
परेल, भोईवाडा, मुंबई ४०००१२ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.शोभना शंकर बहाडकर या दि.३०/०८/२०१७ रोजी पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांचे पती कै. शंकर रामचंद्र बहाडकर हे दि.१०/०१/२००६ रोजी मयत झाले. त्यांचा मुलगे कै.महेंद्र शंकर बहाडकर हे दि.१५/०७/२००७ रोजी मयत झाले व कै.संजय शंकर बहाडकर हे दि.२७/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिटी सर्व्हे नं.१५३९ आणि १५४० या भूखंडावर अस्तित्वात असलेल्या रुक्मिणी को.ऑप.हौ.सोसायटी या इमारतीमधील, सदनिका क्र.८, पहिला मजला, क्षेत्र ३६५ चौ.फूट बिल्टअप**

अर्जदार हे कै.शोभना शंकर बहाडकर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२६/०८/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.१५१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१४/१०/२०२२

१) श्रीमती.आनंदीबाई नथुराम ठाकूर
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.चंद्रकांत नथुराम ठाकूर
वय : ४८ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.बाळकृष्ण नथुराम ठाकूर
वय : ५९ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.गुरुनाथ नथुराम ठाकूर
वय : ५५ वर्षे, धंदा : नोकरी
५) श्री.जयवंत नथुराम ठाकूर
वय : ६० वर्षे, धंदा : नोकरी
वरील क्रं.१ ते ५ रा.मु.पो.जासई,
ता.उरण, जि.रायगड ४१०२०६
६) श्रीमती.अहिल्या भगवान ठाकूर
पुर्वाश्रमीचे नाव श्रीमती.अहिल्या नथुराम ठाकूर
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.साईनगर चिर्ले, पो.जासई,
ता.उरण, जि.रायगड ४१०२०६
७) श्रीमती.अनघा अनिल पाटील
पुर्वाश्रमीचे नाव श्रीमती.अनघा नथुराम ठाकूर
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.दापोली, पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
८) श्रीमती.सुनिता अमित म्हात्रे
पुर्वाश्रमीचे नाव श्रीमती.सुनिता नथुराम ठाकूर
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जासई, ता.उरण, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ ते ८ यांचे वडील कै.नथुराम पोसू ठाकूर हे दि.०४/०७/२०२० रोजी मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच कै.नथुराम पोसू ठाकूर यांची आई कै.चाऊबाई पोसू ठाकूर ह्या सन १९६० साली मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.नथुराम पोसू ठाकूर हे मयत झाले आहेत ते हयात असताना त्यांच्या मृत्यू समयी त्यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत होती व आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| १३५ | ३२ | १ | ००-०२-८० |
| | ३२ | ७ | ००-१५-०० |
| | ३२ | ११ | ००-२७-८० |
| १८/८८ | १०८ | १ | ००-१९-८० |
| | १०८ | ६ | ००-१०-१० |
| ११/९० | १०७ | २ | ००-०५-३० |
| | १५२ | ६ | ००-२०-०० |
| २/२००० | १५३ | २ | ००-०७-०० |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

येणेप्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दखल केला आहे. वरील अर्जदार हे तसेच कै.नथुराम पोसू ठाकूर यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२६/०८/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण**

# संक्षिप्त...

## म्हसळा येथे धर्मवीर आनंद दिघे यांना विनम्र अभिवादन



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुका शिवसेना संघटना यांच्या तर्फे म्हसळा येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात धर्मवीर आनंद दिघे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी श्रीवर्धन मतदार क्षेत्र संघटक माजी उप सभापती रवींद्र लाड, तालुका प्रमुख सुरेश कुडेकर, युवा सेना तालुका अधिकारी अमित महामुनकर, सरपंच अनंत नाक्ती, उप सरपंच पांडुरंग सुतार, पत्रकार संघाचे अध्यक्ष शशिकांत शिर्के, शहर प्रमुख अनिकेत पानसारे, उप शहर प्रमुख दिपल शिर्के, अ.वा.से. उप अध्यक्ष नितीन पेरवी, संतोष सुर्वे, उप शहर अधिकारी अजय करंबे, प्रसाद बोर्ले, सर्व पदाधिकारी, महिला आघाडी, युवा सेना पदाधिकारी, अ. वा. से. पदाधिकारी, व सर्व शिवसैनिक उपस्थित होते.

## भाजपा सांस्कृतिक सेल पनवेल तर्फे 'सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२२' स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपा सांस्कृतिक सेल पनवेल तर्फे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली व पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली 'सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२२' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी मर्यादित असून या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या मंडळास १५ हजार रुपये व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकास १० हजार रुपये व सन्मानचिन्ह तर तृतीय क्रमांकास ०५ हजार रुपये व सन्मानचिन्ह अशी भरघोस रक्कमेची पारितोषिके असणार आहेत. स्पर्धेचे परीक्षण हे ऑफलाईन स्वरुपात असून आयोजकांचे परिक्षक पॅनेल प्रत्यक्ष मंडळाला भेट देऊन परीक्षण करतील. या स्पर्धेत सहभाग नोंदणीची अंतिम तारीख ०१ सप्टेंबर २०२२ असून ९०२९५८०३४३, ८०९७२४८८७७ किंवा ९६१९४४१३६७ या क्रमांकावर करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# दिघीकरांना कमी - जास्त वीजेचा फटका ; महावितरण विभागाची अनास्था

## ग्रामसभेत दिघी ग्रामस्थ आक्रमक; मात्र, ग्रामपंचायत हतबल

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी परीसरातील गावांना विद्युत पुरवठ्यासाठी अनेक वर्षांपासून अडचणींचा सामना करावा लागत आहे. कमी जास्त दाबामुळे विद्युत उपकरणांचे नुकसान होत असल्याने वीज पुरवठा सुरळीत सुरू करावा, अशी मागणी गणेशोत्सवाच्या पाश्र्वभूमीवर दिघी ग्रामसभेत करण्यात आली. यावेळी ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली.



दिघी येथे औद्योगिकदृष्ट्या उभारण्यात आलेलं पोर्ट बहुचर्चित आहे. मात्र, यामुळे विकसित तालुका म्हणून ओळख पुढे येत असली तरी येथील विद्युत मंडळाचा कारभार रामभरोसे असल्याचे ग्रामस्थांकडून म्हटले जाते. पर्यटनाच्या जोडीला रोजगार निर्मितीसाठी औद्योगिकरणाची भर पडली. मात्र, याच पोर्ट परिसरातील दिघी, करलास, नानवली, मनेरीसह अनेक गावांना महावितरणच्या दुर्लक्षित कारभाराचा फटका बसत आहे. २० हजाराहून अधिक लोकसंख्या असणारा परिसर आहे. येथे कमी – उच्च दाबाचा वीज पूरवठा होत असल्याने अनेक घरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणात बिघाड होण्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या तक्रारी घेऊन ग्रामस्थांनी दिघी ग्रामसभेत महावितरण विरोधात समस्येचा पाडा वाचला.

गेल्या अनेक दिवसांपासून कमी अधिक दाबाने वीज पुरवठा होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेकांचे टी. व्ही., फ्रीज, संगणक, इनव्हर्टर यांचे नुकसान झाले असून वीज वितरण कंपनी याकडे सोईस्कर दुर्लक्ष करीत असल्याचे आरोप करण्यात आले. एकीकडे वाढीव बिल किंवा उशिरा वीजबिल मिळाले असले तरी वेळेत नभरल्यास वीज खंडित केली जाते. मग आमचे होणारे नुकसान याची भरपाई कोण देणार , असा संतप्त सवाल भर सभेत ग्रामस्थांनी मांडला.

गोंडघर सबस्टेशन वरून दिघी विभागात विद्युत लाईन जोडण्यात आली आहे. इथपर्यंत आणण्यात आलेल्या विद्युत वाहिन्या डोंगर कपारातून आल्या आहेत. ही जोडणी फार जुनी असल्याने या सप्लायमधील कंडक्टर कार्बनने खराब झाले आहेत. मागील दिवसात या भागातील संपूर्ण तांत्रिकदृष्ट्या दुरुस्तीसाठी वरिष्ठांकडे प्रस्ताव देण्यात आला आहे. त्यानुसार वीज सुरळीत मिळेल अशी माहिती दिघी येथे अभियंता महेश शिरोडकर यांनी दिली.

# तळा नगर पंचायत विकास आराखडा बैठकीत विविध विषयावर चर्चा

**दै.रायगड नगरी । तळा**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या प्रकरण तीन विकास योजना अन्वये नवीन नियोजन प्राधिकरण तळा नगरपंचायत स्थापन झाल्यानंतर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजन विकास आराखडा करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामध्ये शहराच्या लोकसंख्येनुसार पुढील २० वर्षासाठी शहराचाविकास आराखडा तयार करण्यासाठी स्थानिक नागरिकांच्या गरजा सोयी–सुविधा स्थानिक व भविष्यात पाहणाऱ्या लोकसंख्येसाठी सोयी–सुविधा आरक्षणाची तरतूद करण्यात येते.

या अनुषंगाने प्रारूप विकास योजना प्रसिद्ध करण्यापूर्वी, स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक विकासक, वास्तुविशारद, स्थानिक सामाजिक संस्था व स्थानिक नागरिकांचे मत जाणून घेण्यासाठी नगर रचना विभागामार्फत सहसंचालक, नगर रचना कोकण विभाग नवी मुंबई मा.जितेंद्र भोपळे यांच्या मुख्य उपस्थितीत नगररचना विभागातर्फे तळा शहराच्या नगररचने बाबतशहरातील मंगलकार्यालयात नागरिकांची बैठक बोलवण्यात आली होती

या बैठकिला नगररचना अधिकारी सतिश उगले, नगर रचनाकार राजेंद्र चव्हाण, मुख्याधिकारी डॉ.धिरज चव्हाण, नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे व्यासपीठावर उपस्थित होते.बैठकीत आजी माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, विविध पक्षांचे पुढारी, पत्रकार, व्यापारी उपस्थित होते तळा शहराच्या रचनेबाबत विस्तृत पध्दतीने चर्चा करण्यात आली. नगररचनेच्या बैठकीत कोणत्या मुद्द्यावर चर्चा करायला हवी याची बहुदा माहिती नसल्याने अनेक जण मूळ विषय सोडून तिसऱ्याच विषयाबद्दल मागणी करताना दिसले.तर काहींनी वयक्तिक हेवेदावे देखील बोलून दाखविले. काही मोजक्या नागरिकांनीच मूळ मुद्दे मांडले माजी नगरसेवक ॲ चेतन चव्हाण यांनी विकास आराखडा भविष्यात चार विचार करून तयार करण्यात यावा. तळा शहराची भौगोलिक परिस्थिती पहाता आवश्यक बाबी नगरविकास विभागाने करावा.

तळगड किल्ला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे तो जपण्यासाठी व लगतच्या परिसरातील नागरिकांना धोका निर्माण झाला तर रेस्क्यु टीम आवश्यक आहे. पाणी वीज मूलभूत सुविधा उपलब्ध व आरक्षीत जागा डंपीग ग्राऊंड, कचरा विघटन खत निर्मिती असे प्लांट उभारणे यावर विकासात्मक मुद्देवर लक्ष वेधले मध्ये प्रामुख्याने नगरसेवक रितेश मुंढे यांनी शहरात उनाड गुरांसाठी कोंडवाडा, शहराला नियमित पाणी पुरवठा, वीजपुरवठा, ड्रेनेज लाईन, अग्निशमन विभाग, ग्रंथालय, शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे गटारे रस्ते प्रत्येकवाडीमध्ये सार्वजनिकशौचालयशवदामिनी, सुस्थितीत रस्ते यांची मागणी केली.

शहराला टाऊन प्लानिंग नसल्याने सांडपाणी निचरा, कचरा, अरुंद रस्ते, खेळाची मैदाने, आरोग्य सुविधा, रुग्णालये, सार्वजनिक मुतारी, भाजी मंडई, पार्किंग समस्या, उद्याने बसस्थानकाचीदूरावस्था, सार्वजनिक आरोग्य अनेक विषयांवर नागरिकांनी आपली स्पष्ट मते मांडली तसेच शहराच्या विकास आराखड्या बाबत नागरिकांच्या असलेल्या शंका लेखी स्वरूपात नोंदवण्यात आल्या विकास योजना प्रसिध्दपूर्व पहिल्याच बैठकीत नागरिकांची स्पष्टोक्ती, नगररचना सह संचालकांनी साधला संवाद साधून नगरविकास केला जाईल असे आश्वासन दिले.

# रोह्यात मनसेची सदस्य नोंदणी ; नागरिकांचा प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा शहर व तालुका मनसेच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान सुरु करण्यात आले असून त्यास नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मनसेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नुकतीच पदाधिकारी मेळाव्यात सदस्य नोंदणी मोहिमेची घोषणा केली. त्यानुसार रोहे शहर व तालुका मनसेच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान सुरु केले. रोहा नगरपरिषद प्रशासकीय कार्यालया समोरील चौकात मनसे दक्षिण रायगड जिल्हा सचिव अमोल पेणकर यांचे प्रमुख उपस्थितीत ही नोंदणी सुरू करण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष अक्षय रटाटे, शहराध्यक्ष मंगेश रावकर, उपशहराध्यक्ष अमित पवार, उपतालुकाध्यक्ष सुरज मुटके, धाटाव विभाग प्रमुख महेश वाडकर, विद्यार्थी सेना रोहे शहर विक्रांत दिंडे, विद्यार्थी सेना युनिट अध्यक्ष रितेश किर्तने, राकेश लुमण, शलाका लुमण आदी पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

या मोहिमेस युवकांसह सर्व वयोगटातील नागरिकांनी उत्साही प्रतिसाद देत आपली सदस्य नोंदणी केली असल्याचे पेणकर यांनी सांगितले. विरोधकांचा समाचार घेत आपण केलेली कामे जनतेपर्यंत पोहोचवा व नव्याने पक्ष सभासद नोंदणी करा असे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आवाहन पदाधिकाऱ्यांना केले होते. रोहे तालुका, शहर मनसेच्या वतीने या मोहिमेची सुरुवात शहरापासून करण्यात आली. यानंतर धाटाव, कोलाड, चणेरा, नागोठणे अशी विभागवार ग्रामीण भागातही सदस्य मोहीम ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे पेणकर यांनी सांगितले.




## करंजाडेमधून सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील करंजाडे येथील एका राहत्या बिल्डिंगच्या पार्किंगमधून सायकलची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

सुनील बाबर, (वय ४६), लोटस को.ऑप हौ. सो. च्या पार्किंगमध्ये ५ हजार रुपये किमतीची हर्क्युलिस कंपनीची हिरव्या व काळ्या रंगाची सायकल चोरीस गेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ड्रायव्हरचा टायर खाली मृत्यू

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एस.आर.के. शिपिंक या कंटेनर यार्ड मध्ये टेलरच्या टायर खाली आल्याने एका अज्ञात ड्रायव्हरचा रात्री ठिक १–३० च्या सुमारास मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

या अपघाताची माहिती मिळताच उरण पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. सदर अज्ञात ड्रायव्हरच्या मृत्यू बदल उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी म्हणून उप पोलीस निरीक्षक पंडीत पाटील हे अधिक तपास करत आहेत.

**सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**दैनिक रायगड नगरी**
**9619979706 / 9619737911**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलांने खरेदीखत करून प्रस्तावित जमीन मालक श्री.राजेंद्र जवानमल गांधी या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर वर्णनित मिळकत ही श्री.राजेंद्र जवानमल गांधी यांच्या प्रत्यक्ष वहिवाटीत व ताबेकब्जात आहे. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चिंचवली तर्फे वाजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| चिंचवली तर्फे वाजे | ३०/२ | ०–९४–४० पो.ख.०–०२–८० एकूण ०–९७–२० | ८.७८ |

वरील वर्णनित मिळकती पैकी एकपक्षी यांच्या ताबेकब्जात व नावे असलेली ०–२२–५५, पोटखराबा ०–०२–८० एकूण ०–२५–३५ हे.आर.पॉ. आकार २.१० रु.पैसे या मिळकतीच्या विक्रीबाबत सदर जाहीर नोटीस

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार–मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.२६/०८/२०२२

**सही/–**
**ॲड.श्री.महेंद्र अनंता पाटील**
**डी/३/१, किनारा को.ऑप.**
**हौ.सो., बावन बंगला, पनवेल,**
**ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.९८२०७९५६०५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| नाव | प्लॉट नं. | सेक्टर नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| श्री.रामा मोतीराम जळे | ६८/बी | २२ | २५० चौ.मी. |

तरी वर वर्णन केलेली मिळकत सिडकोने १२.५ टक्के योजनेंतर्गत आमच्या अशिलांना दिनांक १७/०७/२०१९ च्या इरादा पत्राने वाटप केले होते. सदरची मिळकत विकसित करण्यासाठी दिनांक ३०/०९/२०१९ रोजी दोस्ती इन्फ्रा तर्फे भागीदार दिपक राघवजी पटेल, २) वसंत देवजी पाटील, ३) प्रमिला महादेव पटेल, ४) गीता शैलेश चौधरी, ५) रमेश कानजी पटेल ऑफिस पत्ता : शॉप नं.४०, सेक्टर १, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४००६१५ ने करार करून विकसित करण्याविषयी दिले होते. परंतु सदर इसमांनी विकासकाने ठरलेल्या मुदतीमध्ये सदर मिळकतीचा विकास केलेला नाही. त्यामुळे सदरचा करार रद्द झालेला आहे. त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली रक्कम स्वीकारली असून झालेला करार रद्द केला आहे. यदाकदाचित सदर विकासकाने आमच्या अशिलासोबत केलेल्या कराराच्या अनुषंगाने यदाकदाचित हक्क निर्माण केला असल्यास ते आमच्या अशिलावर बंधनकारक नाही. तसेच सदरचे कराराच्या अनुषंगाने इतराबरोबर कोणताही करार केलेला नाही व बोजा ठेवलेला नाही म्हणून विकासकाने आमच्या अशिलांना अस्वस्थ केले आहे. म्हणून आम्ही आमच्या अशिलांतर्फे सदरकामी जाहीर प्रकटनाद्वारे कळवितो की,

तरी सदर मिळकतीसंबंधी कोणाही व्यक्तींचा अथवा व्यक्तीचा अथवा कोणतेही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी साठेकरार कुळहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा, हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती आणि त्यांच्या हकरतीत नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत प्रत्यक्ष येवून अथवा रजि. पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजा रहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा त्रयस्था बरोबर व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे कळावे.

दि.२६/०८/२०२२

**सही/–**
**श्री.अरविंद चामले**
**ॲडव्होकेट व नोटरी भारत सरकार**
**ऑफिस : ११, स्नेह सदन,**
**गडकरी पथ, पनवेल, जि.रायगड**
**फोन नं.२७४५६१७८**
**मो.नं.९८६९५५१७८५**

## माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

**माथेरान ता.कर्जत, जि.रायगड ४१०१०२**

ई–मेल आयडी–mcomatheran@gmail.com

जावक क्रमांक–मागिनप/१०२९/२०२२–२३ दिनांक : २६/०८/२०२२

### जाहीर सूचना

**एकल वापराच्या प्लास्टीक वस्तूंचे उत्पादन, व्यापार, साठा, वितरण, विक्री आणि वापरावर बंदी घालण्याची सुचना**

केंद्र सरकारच्या पर्यावरण व वने व हवामान बदल मंत्रालयाने अधिसुचना क्र.G.S.R. ५७१ (E) दि.१२ ऑगस्ट २०२१ रोजी जारी केली आहे. यानुसार १ जुलै २०२२ पासून एकल वापर प्लास्टीकचे उत्पादन, आयात, साठवण, वितरण विक्री, आणि वापरावर बंदी आहेत.

सुधारित प्लास्टीक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नियम ४ (२) अन्वये यानुसार १ जुलै २०२२ पासून पॉलिस्टीरिन आणि विस्तारित पॉलिस्टीरीनसह खालील सिंगल युज प्लास्टीकचे उत्पादन, आयात, साठवण, वितरण विक्री, आणि वापरावर बंदी असेल.

अ) प्लास्टीकच्या कांड्यासह कानकोरणी, फुग्यांसाठी प्लास्टीकच्या कांड्या, प्लास्टीक झेंडे, केंडी, कांड्या, आईस्क्रिम कांड्या.

आ) सजावटीसाठी प्लास्टीक व पॉलिस्टीरिन (थर्माकोल)

इ) प्लेट्स, कप, ग्लासेस, कटलरी, जसे काटे, चमचे चाक, पिण्यासाठी स्ट्रो. ट्रे. ढवळण्या, (स्टीरर्स), मिठाईचे बॉक्स, आमंत्रण कार्ड, सिगारेटची पाकीटाभोवती प्लास्टीक फिल्म गुंडाळणे किंवा पॅक करणे, प्लास्टीकच्या पीव्हीसी बॅनर (१०० मायक्रॉन पेक्षा कमी) याबरोबरच महाराष्ट्र प्लास्टीक व थर्मोकोल अधिसूचना २०१८ अंतर्गत खालील अतिरिक्त एकल वापर प्लास्टीकचा वापर मार्च २०१८ पासूनच प्रतिबंध आहेत.

१) सर्व प्रकारच्या प्लास्टीकच्या पिशव्या (कॅरी बॅग्स)– हॅडल असलेल्या व नसलेल्या, कंपोस्टेबल प्लास्टीक (कचरा व नर्सरीसाठीच्या पिशव्या सोडून)

२) सर्व प्रकारच्या नॉन–ओव्हनबॅग्स (पॉलिप्रोपिलीन पासून बनविलेले)

३) एकल वापर प्लास्टीकचे उत्पादन–डिश, बाउन, कॅन्टेनर (डबे) (हॉटेलमध्ये अन्नपदार्थ पॅकेजिंग करिता)

सदर जाहीर सुचनेद्वारे सर्व उत्पादन, साठवणूकदार, वितरणकर्ता, दुकानदार, ई. कॉमर्स कंपन्या, यावर विक्री करणारे व्यवसाईक आस्थापना (मॉल, मुख्य बाजार विक्री केंद्र/सिनेमा केंद्र/पर्यटन ठिकाण/शाळा/महाविद्यालय/कार्यालयीन इमारत/रुग्णालय व खाजगी संस्था) तथा सामान्य नागरिकांना सुचित करण्यात येते की, वरील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

उपरोक्त अधिसुचनेने उल्लंघन करणाऱ्यांवर माल जप्त करणे, पर्यावरणीय नुकसान भरपाई आकारणे, उद्योग, व्यावसायिक आस्थापना यांचे कामकाज बंद करणे तसेच खालीलप्रमाणे योग्य ती कारवाई केली जाईल.

| अ.क्र. | गुन्ह्याचे स्वरुप | दंडाची रक्कम व स्वरुप |
|---|---|---|
| १ | पहिला गुन्हा | रु.५०००/– |
| २ | दुसरा गुन्हा | रु.१०,०००/– |
| ३ | तिसरा गुन्हा | रु.२५,०००/– व ३ महिन्याचा कारावास |

**सही/–**
**(सुरेखा भणगे)**
**मुख्याधिकारी**
**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**